जा.क्र.: कक्ष-६/जमीन/९३५५/२०१०-२०११
वनसंरक्षक, पुणे वन विभाग, पुणे
यांचे कार्यालय, सेनापती बापट मार्ग,
पुणे : ०४ दिनांक : ८२ /१०/२०१०

पत्र -

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
पुणे.

**विषय :** राज्यातील खाजगी वनासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयातील एसएलपी क्र.११३९८/२००८ व इतर याचिकेमध्ये शपपत्र दाखल करणेबाबत.

**संदर्भ :** आपलेकडील ज्ञापन क्र. कक्ष-१/जमीन/सीईसी/२६६४ दि.-/१०/१०

कृपया संदर्भांकित क्रमांकाचे अवलोकन होणेस विनंती.

विषयांकित विषयाच्या अनुषंगाने संदर्भांकित ज्ञापना सोबत मुख्य वनसंरक्षक (सं) म.रा.नागपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्र. कक्ष-१२/जमीन/३/ठाणे/प्रक/१३०/१०-११/६८९ दि.१/१०/२०१० अन्वये उपस्थित केलेल्या काही मुद्दे नमुद करुन सुधारीत अहवाल सादर करण्यास कळविले आहे. प्राप्त झालेल्या पत्रात खालील मुद्दे उपस्थित केले आहे.

" सादर केलेल्या माहितीतील श्रीमती कपूर व श्रीमती मेहरा यांचे प्रकरणाचे बाबतीत २.३२ हे. क्षेत्राकरीता कॅटेगरी (IC) नमुद केली आहे. तथापी कॅटेगरी I चे मुख्य अटीमध्ये महसूल खात्याकडील व वनखात्याकडील शासकिय अभिलेख्यामध्ये प्रश्नांकित क्षेत्राची दि. २२/०६/२००५ पूर्वी 'वन' म्हणुन नोंद नसावी असा उल्लेख आहे तथापी या कार्यालयाचे अभिलेख्याप्रमाणे मधू कपूर व राधिका मेहरा यांचे प्रश्नांकित गट नं. १३ व १५ क्षेत्र २.३२ हे. चे बाबतीत उप विभागीय अधिकारी, मावळ यांचे दि. ०८/०७/२००४ अन्वये महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम १९७५ चे कलम २२ अ खाली पुनःस्थापन आदेश पारित झालेले आहे. सदर आदेशात प्रश्नांकित क्षेत्र वन जमीन म्हणून राहिल अशी नोंद आहे.

सदर आदेश विचारात घेता व सी.ई.सी चे शिफारसीतील कॅटेगरी III मधील अटी विचारात घेता प्रश्नांकित क्षेत्र कॅटेगरी III मध्ये येईल अशी या कार्यालयाची धारणा आहे करीता सदर बाब तपासुन या प्रकरणा संदर्भात सुधारीत माहिती सादर करावी"

उपरोक्त नमुद मुद्या संदर्भात वस्तुस्थिती खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

माहिती अधिकारी
तथा
मुख्य लेखापाल,
पुणे वन विभाग, पुणे.

श्रीमती कपूर व श्रीमती मेहरा यांचे प्रकरणाचे बाबतीत २.३२ हे. क्षेत्राबाबत या कार्यालयांस जे कागदपत्र सादर केले ते पाहता त्यावरुन या कार्यालयाने सदर क्षेत्र Commercial Category - I - Sub Category I (C) अशी दर्शविण्यात आलेली आहे.

प्रश्नांकित गट नं. १३ व १५ क्षेत्र २.३२ हे. उप विभागीय अधिकारी, मावळ यांनी त्यांचे कडील दिनांक ०८.०७.२००४ अन्वये महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम, १९७५ चे कलम २२ (अ) खाली पुनःस्थापन आदेश पारित झालेले आहेत. सदर आदेशात प्रश्नांकित क्षेत्र वन जमीन म्हणून राहिल. तथापि, ७/१२ अभिलेखात प्रत्यक्षात दिनांक ०८.१०.२००८ रोजी "महाराष्ट्र खाजगी वन" अशी नोंद घेण्यात आलेली आहे. त्यामुळे (१) उप विभागीय अधिकारी यांचे आदेश जरी असले तरी प्रत्यक्षात (२) ७/१२ अभिलेखात घेतलेली दिनांक ०८.१०.२००८ रोजी नोंद घेतलेली आहे.

तसेच संबंधीतांनी महाराष्ट्र शासनाकडे अर्ज केल्यावर सहसचिव,महसूल व वनविभाग, मंत्रालय मुंबई ३२ यांनी त्याचेकडील पत्र क्र.एफएलडी/२००५/प्रक्र/४९८/फ-१० दि. २८/०९/२००५ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्तावही सादर केलेला आहे. तसेच सदर प्रस्ताव संस्करण होऊन मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचे कार्यालयास सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाबाबत मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांनी त्याचेकडील पत्र क्र.कक्ष-१७/नोसेल/२/२२/२००७ दि.२०/११/०८ अन्वये कळविले आहे , की, प्रस्तुत प्रस्तावाबाबत काही आरोप असल्यामुळे विधी व न्याय विभागाचे मत घेण्याकरीता शासनास कळविले आहे त्यामुळे शासनाचे निर्देश प्राप्त झाल्यानंतर त्याप्रमाणे कळविण्यात येईल. तोपर्यंत प्रस्ताव वनसंरक्षक, यांचेस्तरावर ठेवावेत.

उपरोक्त बाबी विचारात घेता प्रश्नांकित क्षेत्र सी.ई.सी.,नवी दिल्ली यांच्या शिफारसींतील कॅटेगरी Category - I - Sub Category I (C) मध्ये दर्शविण्यात आले असुन ते बरोबर आहे अशी या कार्यालयाची धारणा आहे. तथापी कॅटेगरी संदर्भात सी.ई.सी., नवी दिल्ली यांच्या वर्गवारीच्या अहवालातील पान क्र. ४३ मुद्दा क्र. ४५ मध्ये नमुद केलेल्या बाबी, उपरोक्त नमुद मुद्दे व श्रीमती कपूर / श्रीमती मेहरा यांनी सादर केलेले कागदपत्र पहाता कॅटेगरीबाबतचा निर्णय वरिष्ठ स्तरावर घेणे उचित होईल. असे या कार्यालयाचे मत आहे.

वनसंरक्षक,
पुणे वन विभाग, पुणे